# देशोन्नती


## ग्रामपंचायत स्तरावरील आर्थिक समावेशन व री-केवायसी शिबिराला ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### बँक ऑफ इंडिया द्वारे कारंजा (घाडगे) येथे आयोजन



देशोन्नती वृत्तसंकलन

**कारंजा (घाडगे) :** सार्वजनिक क्षेत्रात कार्यरत जिल्ह्याची लीड बँक, बँक ऑफ इंडिया द्वारे कारंजा (घाडगे) येथे आर्थिक समावेशन संपृक्तता मोहीम अंतर्गत जन धन खाते, जन सुरक्षा, अटल पेन्शन, डिजिटल फसवणूक प्रतिबंधक मार्गदर्शन व री-केवायसी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिराचा उद्देश ग्रामीण नागरिकांपर्यंत आर्थिक योजनांचे फायदे पोहोचवणे आणि वेळेत री-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे हा होता. या कार्यक्रमाला प्रामुख्याने बँक ऑफ इंडियाचे कार्यकारी निदेशक राजीव मिश्रा, सचिन शेंडे, क्षेत्रीय निदेशक, भारतीय रिझर्व्ह बँक, नागपूर, अंजना श्यामनाथ, उपमहाप्रबंधक, भारतीय रिझर्व्ह बँक, नागपूर, कुश गन्होत्रा, अन्चालिक प्रबंधक, बँक ऑफ इंडिया, विदर्भ अंचल, जितेंद्र कुमार मस्तमौला, राहुल अवसरे उप-अन्चालिक प्रबंधक, बँक ऑफ इंडिया, विदर्भ अंचल, विनोद कुमार, उपमहाप्रबंधक, भारतीय रिझर्व्ह बँक, नागपूर, सुशांत पाटील जिल्हा विकास अधिकारी, नाबार्ड, चेतन एस. शिरभाते जिल्हा अग्रणी प्रबंधक, वर्धा व स्थानिक प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी विश्वास शिरसाठ, उपविभागीय अधिकारी आर्वी, तसेच हंसा मोहने, तहसीलदार, कारंजा तसेच बँक ऑफ इंडियाचे इतर कर्मचारी सुद्धा उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांचे पारंपरिक स्वागत करून झाली, त्यानंतर बँक मित्र आणि स्वयं सहाय्यता गट यांच्या स्टॉलला भेट देण्यात आली, जिथे स्थानिक पातळीवर पुरवल्या जाणाऱ्या बँकिंग सुविधा व उपक्रम प्रदर्शित करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँक ऑफ इंडियाचे आंचलिक प्रबंधक कुश गणहोत्रा यांनी केले. कार्यकारी निदेशक राजीव मिश्रा यांनी, आर्थिक विकास आणि नागरिक सक्षमीकरणासाठी वित्तीय समावेशनाचे महत्त्व अधोरेखित केले तसेच प्रधानमंत्री जन धन योजना, अटल पेन्शन योजना, जीवन सुरक्षा योजना यांचे फायदे सांगितले. उपस्थित ग्राहकांना री-केवायसी करिता आवाहन केले. बँकेचे आरसेटी प्रशिक्षण संस्थेतर्फे दिले जाणारे निशुल्क प्रशिक्षणाचा लाभ रोजगार निर्मिती साठी करावे असे सुचविले.

शिबिरादरम्यान १००० हून अधिक ग्राहकांनी यामध्ये सहभाग घेतला. त्यातून २३२ री-केवायसी, २८३ प्रधानमंत्री जीवन ज्योति विमा योजना, ४५० प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, ३२६ अटल पेन्शन योजना आणि १४ प्रधानमंत्री जन धन योजनेचे अर्ज शिबिरात प्राप्त झाले. त्यानंतर प्रधानमंत्री जीवन ज्योति विमा योजनाअंतर्गत ४ लाभार्थ्यांना व प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनाअंतर्गत ३ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. तसेच ५ महिला बचत गटांना रुपये ५० लाख रुपयांचे कर्ज मंजुरी चे धनादेश वाटप करण्यात आले व पिक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या ५ शेतकऱ्यांचा सुद्धा सन्मान करण्यात आला तसेच आर्थिक समावेशन आणि सायबर फसवणूक प्रतिबंध याविषयी जनजागृतीसाठी एक पथनाट्य सुद्धा


Wardha Edition

Aug 19, 2025 Page No. 6

Powered by: erelego.com